(6)

(333)

(२७)

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८, कामगार कल्याण विभाग
क्रमांक – काक/३/कावि/३७८/२०१३
दिनांक – २१ जून २०१३

**विषय** – महानगरपालिकेमार्फत देण्यात येण-या कंत्राटी कामाचा व ती कंत्राटी कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणा-या कामगाराचां विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्याबाबत.

**संदर्भ** – १. शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विमासं-०९८/प्र.क्र.२९/९८ दिनांक १९.८.१९९८

२. परिपत्रक नगर विकास क्रं.नापपा/१००९/सं.क्रं३९/नवि २४, दिनांक ९.४.२००९

३. कार्यालय परिपत्रक क्रमांक काक/३/कावि/१४४/२००९ दिनांक ९.४.२००९

४. कार्यालय परिपत्रक क्रमांक काक/३/कावि/33/२०१० दिनांक २९.३.२०१०

५. शासकिय विमा निधी महाराष्ट्र राज्य याचेकडील पत्र आ. क्रमांक एलओ/२३११, दिनांक १९.५.२०११

६. कार्यालय परिपत्रक क्रमांक काक/३/कावि/२०२/२०११ दिनांक ९.४.२०११

७. प्रविनि २३१३/सहविमा पिंपरी चिंचवड महानगरपालिका/फ़ दिनांक १ जून २०१३

२/-पिंपरी चिंचवड महानगरपालिका कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाचे व कामगारांचा विमा शासकीय विमा निधी कार्यालयाकडे उतरविणेबाबत शासनाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार या विभागाकडील संदर्भ क्रमांक ३,४ आणि ६ अन्वये सर्व संबधीत विभागांना कंत्राटदारांच्या कामाचे व कामगारांचे विमे शासनाच्या शासकिय विमा निधी कार्यालयाकडे उतरविण्याबाबत कळविलेले आहे. यासंदर्भात शासकिय विमा निधी कार्यालयाने पुन्हा उपरोक्त संदर्भ क्रमांक ७ चे पत्र पाठवून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकांनी त्यांच्या संपुर्ण मालमत्तेचा व महानगरपालिकेतर्फे देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा (CAR) व त्या कामावर काम करणा-या कामगारांचा (WC) विमा थेट पध्दतीने शासकीय विमा निधी उतरविण्याचे बंधन प्रकर्ता या नात्याने महानगरपालिकेवर असल्याचे कळविले आहे.

त्यानुसार कंत्राटदारांना स्थानिक व तत्पर सेवा मिळावी व प्रशासकिय सोयीसाठी दिनांक १.४.२०१३ ते ३१.३.२०१४ या कालावधीसाठी महानगरपालिका कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाचे व कामगारांचा विमा सहविमा पध्दतीने मे. नॅशनल इन्शोरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय, जय टावर्स १५४/४/२ काळभोरनगर, पुणे मंबई रोड, चिंचवड, पुणे- १९ यांच्याकडे उतरविण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. अन्य विमा कंपनी कार्यालयाकडून अथवा मे.नॅशनल इन्शोरेन्स कंपनीच्या अन्य कार्यालयाकडून विमापत्रे सादर झाल्यास ती स्विकारु नयेत. तसेच महानगरपालिका कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाचे व कामगारांचा विमा उतरविण्याकरीता कंत्राटदारांनी केवळ मे. नॅशनल इन्शोरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय, जय टावर्स, १५४/४/२ काळभोरनगर, पुणे मुंबई रोड, चिंचवड, पुणे-१९ या कार्यालयातच संपर्क करावा. या संदर्भात शासकिय विमा निधी कार्यालयाने पाठविलेले पत्र माहितीसाठी सोबत पाठवित आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

प्रतिलिपी - सर्व विभाग प्रमुख

----------------------------------

----------------------------------

kspariptrake378.doc